

## सोशल डिजिटल

शिवाजी जाधव

# माध्यमांच्या अंतरंगात डोकावताना...

**सोशल मीडियाने आपल्या जगण्याचा सर्व अंगांना स्पर्श केला आहे. आपल्या आवडी-निवडीपासून निर्णय प्रक्रियेपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर सोशल मीडियाची भूमिका निर्णायक ठरते. भल्या-बुऱ्या अनेक घटना, घडामोडींना कारण ठरलेल्या आणि सकारात्मक तसेच नकारात्मक गोष्टींसाठी नेहमी चर्चेत असलेल्या या नवमाध्यमाचा लेखाजोखा मांडणाऱ्या 'सोशल-डिजिटल' या नव्या सदरातून शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील डॉ. शिवाजी जाधव हे दर बुधवारी आपल्याशी संवाद साधतील.**

**मानवाच्या विकासाच्या प्रत्येक** टप्प्यावर माध्यमांची भूमिका महत्त्वाची, तितकीच निर्णायक राहिली आहे. मौखिक परंपरेपासून आजच्या डिजिटल व्यवस्थेपर्यंतच्या प्रत्येक पायरीवर मानवाने माध्यमांचा अत्यंत खुबीने उपयोग करून घेतला आहे. माध्यमे खरंतर माहितीचे वहन करणारी साधने आहेत. माहिती एकाकडून दुसऱ्याकडे किंवा एकाकडून अनेकांकडे वाहून नेण्याची माध्यमांची क्षमता जेवढी अधिक, तेवढी ती माध्यमे प्रबळ मानली जातात. एका अर्थाने माध्यमे संदेश वहनाचे काम करतात. माध्यमांना स्वतःचा असा काही स्वतंत्र विचार, भावना, धारणा किंवा भूमिका असत नाहीत. माध्यमात कोणता संदेश किंवा माहिती आहे, त्यावर त्या माध्यमांचा कोणता विचार आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे माध्यमांची चर्चा करत असताना आपल्याला त्याच्यातील आशयाची चर्चा करावी लागणार आहे.

कोणत्याही माध्यमाचा आशय नीट समजून घेतल्याशिवाय त्या माध्यमाला समजून घेता येणार नाही. याच आशयावर माध्यमांचे ग्राहक ठरतात. माध्यमात आशय किंवा माहिती काय असावी, हे ठरवणारी एक व्यवस्था असते. या व्यवस्थेने ठरवून दिलेल्या चौकटीला माध्यमाचे धोरण म्हटले जाते. प्रत्येक माध्यमाचे स्वतःचे असे धोरण असते. एक विचार किंवा भूमिका असते. ही धोरणे निर्णय प्रक्रियेवर थेट परिणाम घडवून आणत असतात. याचा थेट संबंध माध्यमांच्या ग्राहकांशी असतो. वाचक, श्रोता, दर्शक किंवा युजर्सवर माध्यमांच्या धोरणांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम घडून येत असतो.

माध्यमांच्या धोरणांचा त्यांच्या ग्राहकांवर नेमका काय परिणाम होतो, हे तपासून पाहण्यासाठी आपल्याला संशोधनाची मदत घ्यावी लागते. माध्यमांच्या वर्तन-व्यवहारांवर जगभर संशोधन सुरू आहे. अनेक विद्यापीठे, संशोधन संस्था, तसेच माध्यम संस्थांनी यासाठी पुढाकार घेतला असून, माध्यमांची गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा शास्त्रीय संशोधनाचा जगभर उपयोग होताना दिसतोय. आपण वेळोवेळी अशा संशोधनाची आणि त्यातून झालेल्या गुणात्मक बदलाची चर्चा करणार आहोत. माध्यमांसाठी म्हणजेच पर्यायाने माध्यमांच्या ग्राहकांसाठी लागणारा आशय किंवा माहिती संकलित करण्यासाठी प्रचंड मोठी यंत्रणा कार्यरत असते. या माहितीवर प्रक्रिया केली जाते. या प्रक्रियेत सर्वांत महत्त्वाचा घटक माहितीची निवड करणे हा होय. माहितीच्या निवडीवरही अनेक घटक प्रभाव टाकत असतात. या प्रभावांचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. माध्यमे सातत्याने तांत्रिकदृष्ट्या प्रगत होत आहेत. या तांत्रिक बदलांचा माहितीचे संकलन, संपादन, निर्णय प्रक्रिया, सादरीकरण, माहितीचे व्यवस्थापन आदी टप्प्यांवर नेमका काय परिणाम घडून आला, याचाही आढावा आपण घेणार आहोत. सोशल मीडियामुळे पत्रकारितेचे रंगरूप बदलले आहे. ही नवमाध्यमे नेमकी आहेत कशी? त्यांचे संचलन, आशय, व्यवस्थापन, ग्राहक, कंपनीकरण, जागतिक भांडवली दबाव, एकसुरी घातक जागतिक माहिती व्यवस्था याचाही विचार आपण तपशिलाने करणार आहोत. समाजमाध्यमांचे उपयुक्ततामूल्य आणि उपद्रवमूल्य आपण या मालिकेत अधोरेखित करणार आहोत. नवमाध्यमांच्या वर्तनशास्त्रावर प्रकाशझोत टाकून त्याच्या नियमन, नियंत्रणाच्या बाबतीत असलेल्या कायदेशीर बाबींचीही चर्चा आपण करणार आहोत.

भारतासारख्या बहुलतावादी देशात सर्वच प्रकारच्या माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यघटनेने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य उपभोगत असताना या स्वातंत्र्यावर घातलेल्या काही मर्यादांचेही भान ठेवणे आवश्यक आहे. माध्यमांचे हक्क, अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या अशा सर्वच मुद्द्यांना आपण येत्या काळात स्पर्श करणार आहोत. माध्यमे समजून घेण्यासाठी आपण दर आठवड्याला भेटू या...

▪ shivaji.jadhav16@gmail.com



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जी. एस. गोकावी, जे. एस. बागी, जी.आर. पळसे, व्ही. टी. पाटील यांनी अभिवादन केले.

# विद्यापीठात जिजाऊ माँसाहेब, विवेकानंद यांची जयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती सोमवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC 'A' Grade

## प्रवेश सूचना

**एम.फिल. व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रक्रिया २०१९-२०**

(राखीव प्रवर्गातील रिक्त जागांकरीता) आणि

**AICTE (ADF) Ph.D. Admission 2020-21**

शिवाजी विद्यापीठामार्फत एम.फिल व पीएच.डी. विशेष प्रवेश प्रक्रिया २०१९-२० करिता (राखीव प्रवर्गातील रिक्त जागांकरिता) पात्र विद्यार्थ्यांकडून आणि **AICTE (ADF) Ph.D. Admission** प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ करिता ऑनलाईन अर्ज मागणी करणेत येत आहेत. याकरिता विद्यापीठ संकेतस्थळ **www.unishivaji.ac.in** मध्ये **"M.Phil./ Ph.D. Special Admission Drive 2019-20"** आणि **"AICTE Doctoral Fellow (ADF) Ph.D. Admission 2020-21"** या लिंकवर भेट द्यावी.

**महत्वाचे दिनांक :**

१. ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध
   दि. १३-०१-२०२१, दुपारी १२.०० वा. पासून
२. अर्ज करण्याचा अंतिम दि. २७-०१-२०२१
   रात्री १२.०० वाजेपर्यंत.

(प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नंतर उपलब्ध करण्यात येईल.)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : १३/०१/२०२१

कुलसचिव

# निधीसाठी किती वर्षे वाट पाहायची?

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर



- उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांना शिक्षण क्षेत्रातून सवाल
- विद्यापीठ विकास निधी, शिष्यवृत्ती प्रश्न कधी मार्गी लागणार
- सातवा वेतन आयोग, जुनी पेन्शन योजना प्रश्न कधी सुटणार

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील ४५ कोटी निधीपैकी ३५ कोटी इतका निधी शासनाकडे प्रलंबित आहे. विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनचे युजीसीने अनुदान बंद केल्यानंतर विद्यापीठ दीड हजार वनस्पतींचे संवर्धन स्वनिधितून केले जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग यासह अन्य प्रश्न प्रलंबित आहे. तसेच महापुरूषांच्या नावाने स्थापन केलेली अध्यासनांसाठी शासनाकडे वारंवार निधी मागूनही मिळत नाही. हे प्रश्न सोडवण्यासाठी निधीची अजून किती वर्षे वाट पाहायची हे तुम्हीच सांगा साहेब असा सवाल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत कोल्हापूर दौऱ्यावर येत असल्याने शिक्षण क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासह मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी वाट पाहावी लागते. विद्यापीठ अंतर्गत केएमसी कॉलेजमधील तीन प्राध्यापक नियुक्तीनंतरचा पगार, वेतन आयोग, सेवानिवृत्ती पेन्शनचा प्रश्न कधी मार्गी लागणार. १९९२ नंतर सेवेत आलेल्या प्राध्यापकांना नेट, सेट मधून सवलत देऊन रूजू झाल्यापासूनचे सर्व लाभ व जुनी पेन्शन योजना कधी लागू होणार. सीएचबीवर काम करणाऱ्या सेट-नेट धारकांना कायमस्वरूपी सेवेत कधी घेणार. कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग जुनी पेन्शन योजना, वेतननिश्चिती, सेवानिवृत्तीनंतरची पेन्शन आदी प्रश्न प्रलंबित आहेत. शासनाकडून फक्त आश्वासनाचे गाजर दाखवले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील जैवविविधता संवर्धन शासनाचे उद्दीष्ट असूनही विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनला शासनाने निधी देत नाही. सुवर्ण महोत्सवी वर्षातील निधी टप्याटप्याने न देता एकत्रित द्यावा, अशी चर्चा विद्यापीठात सुरु आहे.

### हिरक महोत्सवी वर्षातील निधीसाठी प्रस्ताव पाठवणार

विद्यापीठाचे हिरक महोत्सवी वर्ष १८ नोव्हेंबर २०२१ ते १८ नोव्हेंबर २०२२ असे आहे. विद्यापीठ स्तरावर कमिट्यांची नेमणूक सुरू असून शासनाकडे हिरक महोत्सवी वर्षासाठी निधी मिळावा म्हणून प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

**डॉ. पी. एस. पाटील**
**(प्र-कुलगुरु शिवाजी विद्यापीठ)**

### नाविन्यपूर्ण योजनेतून निधी मिळाला तर...

विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात जिल्हा नियोजन समितीमधून नाविन्यपूर्ण योजनेतून दोन वर्षापूर्वी प्लास्टिकपासून थर्नेस ऑईल, आणि वॉटर फ्री स्वच्छतागृहासाठी निधी मिळाला होता. हे प्रयोग यशस्वी झाले. त्यामुळे भविष्यात नाविन्यपूर्ण योजनेतून विद्यापीठाला संशोधनासाठी निधी मिळाला तर प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांना संशोधनासाठी वाव मिळेल.

### अध्यासन केंद्रांना निधीची गरज

अध्यासन केंद्रांचा युजीसीकडून मिळणारा निधी बंद झाल्यापासून विद्यापीठ खर्चातून अध्यासने चालवली जातात. त्याच्या वार्षिक खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र युजीसीला पाठवले जाते. भविष्यात निधी मिळेल अशी आशा आहे, परंतू राज्य शासनाने निधी दिला तर अध्यासने उत्तमरित्या चालवण्यास मदत होईल.

### महाविद्यालये कधी सुरू होणार?

कोरोना कालावधीत विद्यार्थी हित लक्षात घेऊन ऑनलाईन शिक्षण सुरू केले. परंतू ग्रामीण भागात रेंजचा प्रश्न असल्याने ४० टक्के विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. त्यामुळे महाविद्यालये कधी सुरू होणार याकडे विद्यार्थ्यांच्या नजरा लागल्या आहेत. विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे.

**प्रा. डी. एन पाटील (सुटा)**

# राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंदांना अभिवादन

कोल्हापूर, ता. १२ : राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती आज साजरी झाली. यानिमित्त विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयात जिजाऊ माँसाहेब, स्वामी विवेकानंद यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात आज जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये, प्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. जे. एस. बागी आदी उपस्थित होते.

**भारतीय शेतकरी कामगार पक्ष**

स्वराज्य संस्थापिका राजमाता जिजाऊ यांची जयंती शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीतर्फे राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेला महिला आघाडीच्या अध्यक्षा अॅड. उज्वलाताई कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन साजरी केली. प्रिया जाधव, गीता वाघमारे, बाबुराव कदम, दिलीपकुमार जाधव, संग्राम माने, आशिष चिले, मधुकर हरेल, मोहन पाटील आदी उपस्थित होते.

**परिवर्तन संस्था**

जिजाऊ यांच्या प्रतिमेस 'परिवर्तन'चे अमोल कुरणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शिवाजी पेठेतील प्रसाद हॉलमध्ये कार्यक्रम झाला. प्रा. सुमन कांबळे म्हणाल्या, ''राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या प्रेरणेमुळेच छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली. जिजाऊ माँसाहेब याच खऱ्या अर्थाने मराठा साम्राज्याच्या संस्थापिका आहेत.'' प्रभाकर कांबळे, मनीषा घुणकीकर, सुवर्णा कुरणे, अंजना धनवडे, वंदना कुरणे, अर्चना कांबळे, भारती कुरणे दिपाली तडवले, सुजाता बनसोडे, कांचन कांबळे, साक्षी कांबळे, स्नेहल साठे,जनाबाई कांबळे, सुरज कांबळे, सौरभ कांबळे,राज कुरणे, जमुना कुरणे आदी उपस्थित होत्या. अक्षय साळवी यांनी आभार मानले.

**न्यू प्राथमिक विद्यालय**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू प्राथमिक विद्यालयात स्वराज्यमाता जिजाबाई, स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी झाली. मुख्याध्यापिका सौ. एस. आर. पाटील यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. शाळेत ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेतल्या. तसेच ऑनलाईन तासावेळी त्यांच्या जीवनकार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली.

**जिजामाता गर्ल्स हायस्कूल**

राजमाता जिजामाता जयंती निमित्त अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राजमाता जिजामाता गर्ल्स हायस्कूल, शुक्रवार पेठ येथे कार्यक्रम झाला. प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, उपायुक्त निखिल मोरे आदी.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. जे. एस. बागी, जी. आर. पळसे, व्ही. टी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव आदी.**

**राजमाता तरुण मंडळ**

रणरागिणी राजामाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राजमाता तरुण मंडळातर्फे के.एम.सी. कॉलेज परिसरातील स्मारकास अभिवादन केले. राजेश क्षीरसागर यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. श्री. क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले. आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, उपायुक्त नितीन मोरे, किशोर घाटगे, वसंत मुळीक, धनाजी आमते, राहुल केर्लेकर, रोहित महाडिक, नीलेश आमते, युवराज पाटील, श्रीकांत लाड, विश्वास वगदे, निवास केर्लेकर, प्रतिक नलवडे, रोहन चव्हाण, संतोष लाड आदी उपस्थित होते.

**देशमुख इंग्लिश स्कूल**

वसंतराव जयवंतराव देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी झाली. सहायक शिक्षक संग्राम पाटील यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद तर सावित्री कांबळे यांच्या हस्ते जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन केले. सहायक शिक्षक सुहास कोळेकर, अथर्व जाधव, सलोनी बंगोडी यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक सुरेश कांबळे अध्यक्षस्थानी होते. प्रमोद गंधवाले उपस्थित होते.

**महाराष्ट्र हायस्कूल**

महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये राजमाता जिजाऊ आणि विवेकानंद जयंती साजरी झाली. मुख्याध्यापक ए. एस. रामाणे यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन केले. सौ. एस. एस. ठोंबरे यांच्या हस्ते जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन केले. उपमुख्याध्यापक ए. एन. जाधव, पर्यवेक्षक यु. एम. पाटील, के. ए. ढगे आदी उपस्थित होते.

**दत्ताबाळ हायस्कूल**

श्री दत्ताबाळ मिशन डिव्हाईन संचलित श्रीदत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूल, श्रीदत्ताबाळ प्राथमिक विद्यामंदिर, श्रीदत्ताबाळ हायस्कूलतर्फे राजमाता जिजाऊंच्या जयंती आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी झाली. तसेच जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन नितीन भिंगारे यांच्या हस्ते तर विवेकानंदाच्या प्रतिमेचे पूजन महेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षा पल्लवी देसाई, सचिव निलेश देसाई, विश्वस्त वेद निलेश देसाई, व्यवस्थापक संदीप डोंगरे, रोहिणी शेवाळे, कीर्ती मिठारी, सचिन डवंग आदी उपस्थित होते.

13 JAN 2021

# विद्यार्थी गावी; वसतिगृह ताब्यात नाहीत

## कॉलेज, अधिविभाग कसे सुरू करणार?; शासन निर्णयाची विद्यापीठास प्रतीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

येत्या २० जानेवारीपर्यंत ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाविद्यालये सुरू करण्याबाबत विचार सुरू असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी सांगितले. मात्र, शिवाजी विद्यापीठास राज्य सरकारचे निर्देश नाहीत. जिल्हा प्रशासनाने विद्यार्थी वसतीगृह अद्याप ताब्यात दिलेली नाहीत. विद्यार्थी आपापल्या गावी आहेत. मग विद्यापीठातील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालये कधी सुरु होणार? असा सवाल केला जात आहे.





**कोल्हापूर : १) बंद असलेले शहाजी विद्यालय. २) कॉलेज सुरू करण्याच्या पार्श्वभूमीवर शहाजी छत्रपती महाविद्यालयात खोल्यांतील बेंचची स्वच्छता करताना कर्मचारी** (छाया : पप्पू अत्तार)

कोरोना प्रार्दुभावामुळे मार्च २०२० पासून महाविद्यालये बंद आहेत. विद्यापीठ अधिविभाग व संलग्न महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिक्षण सुरु आहे. काही दिवसांपूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक तत्वे (एसओपी) जाहीर केली आहेत. नुकतेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री कॉलेज सुरु करण्याचे संकेत दिले आहेत.

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये, विद्यापीठातील ४० अधिविभाग आहेत. यात सुमारे अडीच लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

कोरोनामुळे मार्चपासून महाविद्यालये, अधिविभाग बंद आहेत. कोविड सेंटरसाठी जिल्हा प्रशासनाने विद्यार्थी वसतीगृह ताब्यात घेतली आहेत. अदयाप प्रशासनाने विद्यापीठास वसतीगृह ताब्यात दिलेली नाहीत. विद्यार्थी आपापल्या गावी गेले आहेत.

महाविद्यालये, अधिविभागाचे सॅनिटायजेशन, विद्यार्थ्यांची सुरक्षा, इतर जिल्हे व परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची तपासणी आदी गोष्टींचे नियोजन झालेले नाही. शासनाकडून महाविद्यालये सुरु करण्याबाबत कार्यप्रणाली निश्चित करण्यात येणार आहे. त्यानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही केली जाणार आहे.

> शासन आदेश, जिल्हा प्रशासनाची मान्यता मिळत नाही, तोपर्यंत महाविद्यालये व विद्यापीठातील अधिविभाग सुरू केले जाणार नाहीत. यासंदर्भात समिती नेमण्यात आली आहे. त्यांच्याकडून आढावा घेऊन शासन निर्देशानुसार कार्यवाही केली जाईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### समिती घेणार आढावा

शिवाजी विद्यापीठाने सांगलीच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून बैठका सुरू आहेत. अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया, शहर व ग्रामीण भागातील महाविद्यालयांमधील सुरक्षेसंदर्भातील उपाययोजना, प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके व प्रकल्प, कोरोनाच्या नव्या संसर्गाची शक्यता अशा मुद्द्यांवर समितीकडून चर्चा सुरू आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसाठी टप्प्याटप्प्याने बोलवता येऊ शकेल का, यासंदर्भातील आढावा घेतला जात आहे.



इस्लामपूर : राजारामबापू शुगर टेकच्या अद्ययावत वेबसाईटचे अनावरण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संचालक उमेश पवार व अन्य.

# राजारामबापू शुगर टेकच्या अद्ययावत वेबसाईटचे अनावरण

**इस्लामपूर : प्रतिनिधी**

येथील राजारामबापू शुगर टेकच्या अद्यावत वेबसाईटचे अनावरण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संचालक उमेश पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. पाटील म्हणाले, साखर व तत्सम उद्योगासाठी महाविद्यालय कुशल मनुष्यबळ निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांना फक्त थेअरी ज्ञान न देता इंडस्ट्रीमध्ये नेऊन दिल्या जाणाऱ्या शिक्षण पद्धतीचे त्यांनी कौतुक केले.

# विद्यापीठाच्या पुनर्प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या रिक्त जागांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा मंगळवारी सुरळीतपणे झाली. परीक्षा ऑफलाईन पद्धतीने 'ओएमआर'द्वारे घेण्यात आली. परीक्षेसाठी २१३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते, त्यापैकी ११७ विद्यार्थी उपस्थित राहिले. मास्टर ऑफ जर्नालिझम, एम. एस. डब्ल्यू., एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, एम. एस्सी बायोकेमिस्ट्री, मास्टर ऑफ रुरल स्टडीज, एम. एस्सी. नॅनो टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. बायोटेक्नॉलॉजी आदी विषयांचा समावेश होता, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.